# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२२

--------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ / श्रावण २७, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उप मुख्यमंत्री | |
| (३) | सांस्कृतिक कार्य मंत्री | |
| (४) | ग्रामविकास व वैद्यकीय शिक्षण मंत्री | |
| (५) | कामगार मंत्री | |
| (६) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (७) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री | |

------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

------------------------------------

### पालघर जिल्ह्यात हत्तीरोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(१) * ४६२८६ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील माहे ऑक्टोबर, २०२१ मधे राबविण्यात आलेल्या संक्रमण पडताळणी सर्वेक्षण मोहिमेत एकूण ८० बालकांना हत्ती रोगाची लागण झाली असून त्यामधे डहाणू,विक्रमगड व तलासरी तालूक्यामधील २९ बालकांचा समावेश असल्याचे दिनांक १५ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३)असल्यास, त्यानुसार हत्तीरोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

पालघर जिल्ह्यामध्ये हत्तीरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत संक्रमण पडताळणी सर्वेक्षण मोहिमेअंतर्गत एकूण ८० बालकांच्या रक्तामध्ये हत्तीरोगाचे रोगजंतू दिसून आले आले होते त्यापैकी डहाणू तालुक्यात २२, विक्रमगड तालुक्यात ४ व तलासरी तालुक्यात ३ असे एकूण २९ बालकांच्या रक्तामध्ये हत्तीरोगाचे रोगजंतू दिसून आले होते.

(२) होय.

या सर्व बालकांची तपासणी करून त्यांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार या आजारासाठीचा प्रतिबंधात्मक उपचार दिलेला आहे.

(३) पालघर जिल्हयात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत-

सामुदायिक औषधोपचार मोहिम- सामुदायिक औषधोपचार मोहिमेत सन मे २०२२ मध्ये डहाणू येथे ४४५४३७ लोकांना (९२.७ % ), विक्रमगड येथे १५१९२८ लोकांना (९७.१९%), तलासरी येथे १५२७९० लोकांना (८९.८१%) हत्तीरोग प्रतिबंधक गोळ्यांचे वाटप करण्यात आले आहे.

विकृती व्यवस्थापन - पालघर जिल्ह्यातील हत्तीरोग रुग्णांना सन २०२० मध्ये ७२७ व सन २०२१ मध्ये ६१९ विकृत्ती व्यवस्थापन (MMDP) कीटचे वाटप करण्यात आलेले आहे.

अंडवृध्दी शस्त्रक्रिया - पालघर जिल्ह्यात सन २०२१ मध्ये ०४ व सन मे २०२२ अखेर ७४ इतक्या अंडवृद्धी शत्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

नियमित उपचार - नियमित विशेष मोहीम तपासणीत आढळून आलेल्या हत्तीरोग संक्रमित रुग्णांची पडताळणी करून सदर रुग्णांना हत्तीरोग प्रतिबंधक गोळीचा नियमित उपचार देऊन समुपदेशन करण्यात आले.

डास नियंत्रण - डास नियंत्रणाकरिता कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करून आढळून आलेले डास अळी दूषित कंटेनर रिकामे करणे तसेच डासोत्पत्ती स्थानामध्ये गप्पी मासे सोडणे, कोरडा दिवस पाळणे, डास विरोधी क्रीम, अगरबत्ती, मॅट इ. चा वापर करून डासांपासून संरक्षण करणे या बाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते.

डासापासून संरक्षण करण्यासाठी कीटक नाशकासह मच्छरदाण्यांचे वाटप करण्यात येते.

रात्र सर्वेक्षण - यामध्ये हत्तीरोग ग्रस्त भागातील रक्त नमुने रात्रीच्या वेळी घेऊन तपासण्यात येतात.

अळीनाशक फवारणी- कार्यक्षेत्रातील निवडक हत्तीरोग ग्रस्त भागात क्षेत्रकर्मचाऱ्यांमार्फत डासांवर नियंत्रण ठेवण्याकरिता ॲबेट, बीटीआय पावडर या रसायनांचा वापर करून डासोत्पती स्थानांत फवारणी करण्यात येते.

कीटकशास्त्रीय सर्वेक्षण- उपलब्ध किटक समाहारकांच्या मार्फत कार्यक्षेत्रातील निवडक भागातील घरामध्ये डास पकडून त्याचे वर्गीकरण करणे, डास घनता काढणे, डासांचे विच्छेदन करणे व डासोत्पत्ती स्थाने तपासणे. इत्यादी कार्यवाही करण्यात येते.

जीवशास्त्रीय उपाययोजना - गप्पी मासे सोडण्या योग्य स्थान उदा. बिनवापराच्या विहिरी, टाकी, कारंजे, मोठे तलाव, मोठे नाले, इत्यादी ठिकाणी गप्पी मासे सोडून डासांची उत्पत्ती कमी केली जात आहे.

आरोग्य शिक्षण- कार्यक्षेत्रातील जनतेस विविध माध्यमद्वारे व प्रत्यक्ष भेटी मध्ये हत्तीरोगाचे कारण, प्रसाराचे कारण, डासोत्पती, औषधोपचार, प्रतिबंधात्मक उपाय इत्यादी बाबत आरोग्य शिक्षण दिले जाते. इ. उपाय योजना राबविल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ. बक्करवाडी(ता.जि. बीड) येथील एका महिलेचा अवैध गर्भपातामुळे झालेला मृत्यू

**(२) * ४५५१३ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बक्करवाडी (ता.जि.बीड) येथील श्रीमती शीतल गणेश गाडे या महिलेचा गोठ्यामध्ये अवैधरीत्या केलेल्या गर्भपातामुळे मृत्यू झाल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अंगणवाडी सेविका, डॉक्टर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, नर्स तसेच सदर महिलेच्या कुटुंबियांविरुध्द पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणातील नर्स यांचा मृतदेह पाली तलावात संशयितरित्या आढळून आल्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, राज्यातील अवैध गर्भपात प्रकरणांचा तपास विशेष पथक नेमून करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा.गृह मंत्री तसेच मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक १६ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

श्रीमती सीताबाई उर्फ शीतल गणेश गाडे, वय ३० वर्षे, राहणार बक्करवाडी ता. जि. बीड या महिलेचा अवैधरित्या केलेल्या गर्भपातामुळे दिनांक ५ जून २०२२ रोजी मृत्यू झाला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे अकस्मात मृत्यूची नोंद असून सदर मयताचा व्हिसेरा सीए तपासणीसाठी औरंगाबाद येथे पाठविण्यात आला आहे.

(४) यासंदर्भातील कोणतेही निवेदन प्राप्त झाले नाही.

(५) सदर प्रकरणातील दोषींविरुध्द महाराष्ट्र प्रसुतीपूर्व गर्भलिंग निदान तंत्र वापर नियम अधिनियम १९८८ व वैद्यकीय गर्भपात अधिनियम १९७१ अन्वये गुन्हा दाखल केला असून ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर ६ आरोपींविरुध्द मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालय, गेवराई, जि. बीड या न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे व सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### पुणे येथील रूबी हॉल क्लिनिक रूग्णालयात किडणी प्रत्यारोपण प्रकरणी झालेला गैरप्रकार

**(३) * ४४७१४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रूबी हॉल क्लिनिक रूग्णालयात किडणी प्रत्यारोपण प्रकरणी मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाले असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात श्री.अमीत साळुंके या रूग्णाने श्रीमती सारिका सुतार या महिलेला १५ लाखाचे आमीष दाखवून त्यांची किडणी काढून दुस-या रूग्णावर प्रत्यारोपण केली असून या प्रकरणी खोटी कागदपत्रे ग्राह्य धरुन प्रत्यारोपण समितीने देखील किडणी प्रत्यारोपणास परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणात डॉक्टरांचा देखील सहभाग असून कागदपत्रांची सखोल तपासणी न करता बी.जे. मेडीकल कॉलेजच्या रिजनल ऑथोराईजेशन कमिटीकडे कागदपत्रे पाठवून समितीची दिशाभूल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, पुणे येथील वानवडीतील इनामदार हॉस्पिटल, ठाण्यातील ज्युपीटर हॉस्पिटल यांचाही बेकायदा किडनी प्रत्यारोपणात सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन बेकायदा अवयव प्रत्यारोपणाची प्रकरणे रोखण्यासंदर्भात तसेच यातील संबंधितांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे आहे

(३) अंशत: खरे आहे. या प्रकरणाची पोलीसांमार्फत सखोल चौकशी सुरू असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) इनामदार हॉस्पिटल, पुणे व ज्युपीटर हॉस्पिटल, ठाणे या रूग्णालयांचा सहभाग असल्याचे पोलीस चौकशीत निदर्शनास आले आहे.

(५) इनामदार हॉस्पिटल, पुणे व ज्युपीटर हॉस्पिटल, ठाणे या रूग्णालयांना स्टेट/रिजनल ऑथोराईजेशन समितीने अवयव प्रत्यारोपणकरीता परवानगी दिलेली असल्याचे निदर्शनास येत असल्याने सदर प्रकरणी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील परिचारिकांच्या विविध मागण्यांची पुर्तता करण्याबाबत**

**(४) * ४४५७७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये कोरोना काळात तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आलेली अनेक पदे रद्द केल्यामुळे कार्यरत परिचारिकांवर कामाचा ताण पडत असल्यामुळे आपल्या विविध मागण्यांसाठी परिचारीकांनी बेमुदत आंदोलन करण्याची घोषणा दि.२३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिचारिकांनी यापूर्वी माहे सप्टेंबर, २०२० तसेच माहे जून, २०२१ या कालावधीमध्येही राज्यव्यापी आंदोलन केले असता त्यांच्या मागण्या तत्वत: पूर्ण करण्याचे आश्वासन शासनाने देऊनही अद्याप त्याची पूर्तता करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वैद्यकीय शिक्षण व आयुर्वेद महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयामधील परिचारिकांची पदे बाह्यस्त्रोतामार्फत भरण्याकरीता शासनाने मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परिचारिकांना सर्व भत्ते केंद्र शासनाप्रमाणे मंजूर करणेसंदर्भात तसेच पदोन्नती संदर्भात तसेच पद भरती बाह्यस्त्रोताद्वारे न करता कायमस्वरुपी पदभरती करण्यासंदर्भातील मागण्या महाराष्ट्र राज्य परिचारक संघटनेकडून करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, परिचारिकांच्या मागण्यांच्या अनुषंगाने त्यांना आर्थिक लाभ व इतर सुविधा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) अंशत: खरे आहे .

परीचर्या संवर्गात कंत्राटी /बाह्य यंत्रणेद्वारे भरती न करता नियमित भरती करणे,केंद्र शासनाप्रमाणे नर्सिंग व इतर भत्ते मिळणे, पदनामात बदल करणे, पदवी पदवीयुत्तर शिक्षण घेतलेल्या परिचारीकांना केंद्रशासनासारखे फायदे मिळणे, स्वतंत्र शुश्रूषा संचालनालय स्थापन करणे, ३०० पेक्षा अधिक अर्जित रजा साठविण्यास मुभा मिळणे, शुश्रुषा संवर्गास प्रशासकीय बदली मधून वगळणे , पदोन्नती करणे इ . मागण्या परिचारीका संघटनेकडून केल्या आहेत.

(३) होय हे खरे आहे.

(४) होय हे खरे आहे.

(५) नियमित पदभरतीस आलेले अडथळे लक्षात घेता कार्यरत परिचारीकांवर अतिरिक्त ताण येउ नये तसेच रुग्ण सेवाही सुरळीत व्हावी यासाठी कंत्राटी व बाह्य स्त्रोताद्वारे अधिपरिचारीकांची नियुक्ती सद्यस्थितीत आवश्यक असल्याचे बैठकी दरम्यान स्पष्ट केले.

सेवाप्रवेश नियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. इतर राज्य शासकीय कर्मचारी प्रमाणे शुश्रूषा संवर्गास देखील ७ व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू केली आहे. भत्त्यांच्या बाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

यावर्षी बदली प्रक्रिया करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात बालकामगार कायद्याची अंमलबजावणी योग्यरित्या होत नसल्याबाबत**

**(५) * ४७२७९ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: अमरावती जिल्हयातील मेळघाटातून स्थलांतरीत आदिवासी कुटूंब अमरावती शहरातील लगतच्या वीटभट्टयांवर मुलांसह भर उन्हात कष्ट करीत असल्याचे दिनांक १२ मे,२०२२ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंजनगाव बारी मार्गावर ५० ते ६० वीटभट्टया असून या परिसरात शेकडो आदिवासी मुले बाल मजूर म्हणून काम करीत असल्याने ही मुले शिक्षणाच्या अधिकारांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच बालकामगार कायद्याची अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर वीट भट्टयावर काम करण्याऱ्या बालमंजुराना शिक्षण व इतर सोई सुविधा देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश खाडे :** (१) दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दि.१२.५.२०२२ रोजी याबाबत बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने कामगार उप आयुक्त,अमरावती यांचे कार्यालयातील अधिकारी व चाईल्ड लाईन्सचे प्रतिनिधी दि.१७.५.२०२२ रोजी अंजणगाव व कोंडेश्वर रोड येथील ७ वीटभट्टयांना बाल कामगार कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने चौकशी करीता गेले असता,तेथे बाल कामगार काम करताना आढळून आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालंयाचे फायर व इलेक्ट्रॉनिक ऑडिट करण्याबाबत**

**(६) * ४५१०८ श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात लागलेल्या आगीत दहा बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याचा दुर्घटनेची गंभीर दखल घेत आरोग्य विभागाने रुग्णालये तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे फायर तसेच इलेक्ट्रॉनिक ऑडीट करण्याचे निर्देश दिल्यानुसार १८३९ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी १६६७ केंद्रांनी फायर एनओसी साठी अर्ज केला असल्याची बाब माहे मे २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, त्यापैकी केवळ १२३ प्राथमिक आरोग्य केंद्राना फायर एनओसी मिळाली असून उर्वरित केद्रांना अद्याप फायर एनओसी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली काय, त्यानुसार रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्राचे फायर तसेच इलेक्ट्रॉनिक ऑडीट तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात लागलेल्या आगीत दहा बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याचा दुर्घटनेची गंभीर दखल घेत आरोग्य विभागाने सर्व शासकीय रुग्णालयांचे फायर ऑडीट करण्याच्या सुचना दिल्या ही बाब खरी आहे.

तथापि, सदयस्थितीत राज्यामध्ये कार्यरत असलेल्या एकुण १८७७ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी १७५४ संस्थांनी फायर ऑडीट साठी अर्ज केला असुन १४९८ संस्थाचे ऑडीट झाले असुन २०८ संस्थांना फायर एनओसी मिळाली आहे.

(३) आयुक्तालयाने पत्र दि.१५.०१.२०२१ व दि.२८.०९.२०२१ अन्वये सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा नियोजन समितीमधुन / इतर योजनेतुन अग्निशामक यंत्रणा बसविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे कळविण्यात आले होते.

शासन निर्णय दि. ०९.११.२०२१ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेमधुन आरोग्य संस्थाना अग्निशामक यंत्रणा बसविणेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हास्तरावरुन अग्निशामक यंत्रणा बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

आयुक्तालयाचे दि.०१.१२.२०२१ अन्वये रुग्णालयातील उपकरणांचा विदयुत भार मोजुन विजेचा पुरवठा सुरळीतपणे होणेसाठी बांधकाम विभागाकडुन योग्य ती कार्यवाही करुन घेण्याबाबत जिल्ह्यांना कळविले आहे. तसेच राज्यातील सर्व रुग्णालयामधील जैव वैदयकिय अभियंत्यांना उपसंचालक आरोग्य सेवा परिवहन , पुणे यांच्याशी संपर्क साधुन रुग्णालयातील विदयुत मांडणी संच बाबतचे प्रशिक्षण देण्याबाबत मुख्य अभियंता (विदुयत) बांधकाम विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाने सहायक मुख्य अभियंता यांची नोडल ऑफीसर म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.
राज्यातील कार्यरत सर्व रुग्णालयांचे फायर ऑडीट झाले असुन त्यापैकी १९ रुग्णालयांना फायर एनओसी प्राप्त झाली आहे. उर्वरित संस्थाची फायर एनओसी मिळण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.
(४) कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## आरमोरी व देसाईगंज (जि. गडचिरोली) या तालुक्यातील जलसंधारणाची कामे मंजूर करण्याबाबत

**(७)** * **४८३३४ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरमोरी व देसाईगंज (जि. गडचिरोली) या तालुक्यातील गाढवी, सती व खोब्रागडी नद्यांवर साठवण बंधारे, कोल्हापूरी बंधारे इत्यादी जलसंधारणाची कामे करण्यात आली नसल्याने नद्यांमधून पावसाचे पाणी वाहून जात असून परिसरात शेती व पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नद्यांवर साठवण बंधारे, कोल्हापूरी बंधारे व नदी खोलीकरण इत्यादी जलसंधारण कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाला सादर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यामध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने साठवण बंधारे, कोल्हापूरी बंधारे तसेच जलसंधारणाची कामे मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही. हे खरे नाही.
(३) गाढवी, सती, खोब्रागडी नदीवर साठवण बंधारे/कोल्हापूरी बंधारे घेण्याबाबत डी.पी.आर. एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली कार्यालयास दिनांक १८/०१/२०२२ रोजी सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कळंबोली, कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील बियर शॉपमुळे नागरिकांना होत असलेला त्रास**

**(८) * ४४८२८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली, कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथे परवानग्या देण्यात आलेल्या बियर शॉप समोरच बियरचे सेवन करणाऱ्या मद्यपिमुळे परिसर अस्वच्छ होत असून नागरिकांना नाहक त्रास होत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बियर शॉपिसमोर बियर सेवन करणारे मद्यपी बियरच्या बाटल्या बाहेरच फेकत असल्याने बाटल्यांच्या काचांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असून महिला वर्गामध्ये या मद्यपींमुळे भितीचे वातावरण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे बियर शॉपीसमोर उघडयावर बियर पिणाऱ्या मद्यपिंवर कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन उघडयावर बियर पिण्यास परवानगी देणाऱ्या बियर शॉप मालकांवर तसेच दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) अंशतः खरे आहे.

पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील कळंबोली, कामोठे कार्यक्षेत्रातील एकूण ७ एफएल/बीआर-२ अनुज्ञप्तीच्या परिसरामध्ये ग्राहक मद्यसेवन करीत असल्याचे आढळून आले आहे.

(२) हे खरे नाही.

असे निदर्शनास आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

बीअर शॉपीसमोर उघड्यावर बीअर पिणारे मद्यपी आढळून आल्यास त्यांचेवर महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ नुसार कारवाई करण्याबाबत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड यांनी संबंधित कार्यक्षेत्रिय अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.

(४) माहे एप्रिल, २०२२ ते जून, २०२२ या कालवधीमध्ये पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील कळंबोली, कामोठे कार्यक्षेत्रातील एकूण ७ एफएल/बीआर-२ अनुज्ञप्तीविरुध्द विभागीय विसंगती गुन्हे नोंद करण्यात आले असून महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत तरतुदीनुसार त्यांचेवर दंडात्मक कारवाई सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात होणाऱ्या भूकंपाचे निरिक्षण नोंदणीसाठी आधुनिक यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत**

**(९) * ४४६३३ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील लोअर दुधना, नाशिक मधील पुनंद व गिराणा आणि बुलढाणा येथील जिगाव या धरणांच्या भागात सतत भूकंप होत असल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरह प्रकरणी जलविज्ञान संशोधन व धरण सुरक्षितता, नाशिक या संस्थेच्या महासंचालकानी शासनास अहवाल सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोयना, अपर वैतरणा, कोळकेवाडी, धोम कण्हेर, वारणा तारळी, भातसा व सूर्या आदी ९ धरणांवर भुकंप मोजणारी आधुनिक ॲक्स्लिरोग्राफ यंत्रणा बसविण्याची जलविज्ञान संशोधन व धरण सुरक्षितता संस्थेने शिफारस केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात विविध भागात होणाऱ्या भुकंपाचे निरिक्षण नोंदणीसाठी तसेच मोठया धरणांच्या सुरक्षितेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
लोअर दुधना व पुनंद धरणाच्या परिसरात ०४ रिश्टर स्केल पेक्षा कमी महत्तेचे सौम्य भूकंप धक्के जाणवलेले आहे.जिगाव व गिरणा या धरण परिसरात मार्च, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान भूकंपधक्के निदर्शनास आलेले नाहीत.
(२) हे खरे आहे.
महाराष्ट्र राज्यातील भूकंपमापन केंद्रे व तेथील उपकरणांचा आढावा व आधुनिकीकरणाबाबत गठीत केलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने अभिप्राय मागविण्यात आले असता,मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता,नाशिक यांचेकडून दि.२८.०२.२०२२ च्या पत्रान्वये अहवाल शासनास सादर केला आहे.
(३) कोयना, भातसा, सुर्या आदी ३० धरणांवर भूकंप मोजणारी आधुनिक भूकंपमापन वेधशाळा यंत्रणा बसविणेबाबत मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांनी शिफारस केली आहे.
तसेच ज्या गुरुत्वाकर्षिय धरणांची उंची ३० मीटर पेक्षा जास्त आहे व जे Zone IV मध्ये आहे अशा कोयना, अप्पर वैतरणा, कोळकेवाडी, धोम, कण्हेर, वारणा, तारळी, भातसा व सूर्या या ९ धरणांमध्ये अत्याधुनिक Accelerographs बसविण्याची शिफारस देखील केलेली आहे.
(४) महाराष्ट्र राज्यातील भूकंपमापन केंद्रे व तेथील उपकरणांचा आढावा व आधुनिकीकरणाबाबत गठीत केलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.२३.०६.२०२२ निर्गमित करण्यात आला असून, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकूण ३० ठिकाणी अत्याधुनिक डिजिटल भूकंपमापन यंत्राची उभारणी करणेबाबत आदेशित केलेले आहे.
त्याअनुषंगाने नाशिक व इसापूर येथील भूकंपमापन वेधशाळेसाठी अत्याधुनिक डिजिटल भूकंपमापन यंत्र खरेदी व उभारणीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. तसेच उर्वरित २८ भूकंपमापन यंत्राच्या खरेदी प्रक्रीयेसाठी तांत्रिक विनिर्देश (Specification) नव्याने तयार करुन त्यास खरेदी समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर यंत्र खरेदीची प्रक्रिया सुरु करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील ससून रुग्णालयात बनावट दिव्यांग प्रमाणपत्र दिले जात असल्याबाबत

**(१०) * ४६८६२ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील ससून रुग्णालयातील अस्थिरोग विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींना बनावट दिव्यांग प्रमाणपत्र दिले जात असल्याचे दिनांक १ मे २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अस्थिरोग विभागाकडून दिव्यांग व्यक्तीच्या वैद्यकीय तपासणीनंतर अपंगत्वाच्या टक्केवारीत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून परस्पर फेरबदल करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले ,
(४) असल्यास, त्यानुसार याप्रकरणात दोषी असलेल्या संबधिंतावर कारवाई करण्यासह अश्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारी विचारात घेऊन विभागाच्या अधिनस्त संस्थामार्फत देण्यात आलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रांची फेरपडताळणी करण्याकरिता दि.१०.०६.२०२२ रोजीच्या संचालनालयाच्या कार्यालयीन आदेशान्वये त्रिस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.उक्त समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिंदखेडा (जि.धुळे) येथील सुलवाडे जामफळ उपसा जलसिंचन योजनेचे काम संथ गतीने सुरू असल्याबाबत**

**(११) * ४४७३६ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिंदखेडा (जि.धुळे) येथील ७८ गावांचा पिण्याचा पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न सोडविण्यासाठी सुरु असलेल्या सुलवाडे जामफळ उपसा जलसिंचन योजनेचे काम सन २०२२ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित असतानाही अद्याप केवळ २५ टक्केच काम झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेस केंद्र शासनाने २४०० कोटींचा निधी मंजूर करुनही कंत्राटदाराच्या बेजबाबदारणामुळे दभाशी येथील मुख्य जॅकवेलचे काम केवळ ५ टक्केच झाल्याचे माहे जून २०२२ मधे वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार योजनेचे काम वेळेत पूर्ण करण्यासह आणि संबंधित कंत्राटदाराविरुध्द कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,
माहे जुन २०२२ अखेर सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेचे ४१.२१ टक्के काम करण्यात आलेले आहे. सदर योजनेचे बळीराजा जलसंजिवनी योजनेअंतर्गत कामे जुन-२०२५ पर्यंत पुर्ण करण्याचे सुधारीत नियोजन प्रस्तावित आहे.
(२) अंशत: खरे आहे,
सदर प्रकल्पास अद्यापपर्यंत माहे जुन २०२२ अखेर एकुण रु. ११०३.५६ कोटी निधी प्राप्त झाला असुन जुन, २०२२ अखेर रु. १०५६.१५ कोटी निधी खर्च झाला आहे.
दभाशी येथील पंपगृह क्र.१ साठी आवश्यक क्षेत्राबाबत न्यायालयीन प्रकरण तसेच भूधारकांचे विरोध यामुळे दि.१२/०४/२०२२ रोजी पुर्ण क्षेत्र उपलब्ध झाले आहे. कंत्राटदारास दिनांक १३/०४/२०२२ पासुन काम सुरु करण्यासाठी जमीन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सद्यस्थितीत पंपगृह क्र.१ चे खोदकाम प्रगतीत आहे.
(३) निविदेच्या अटी व शर्तीनूसार कंत्राटदारास नोटीस बजावण्यात आली असून त्यानूसार पुढील उचित कार्यवाही करणेत येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उजनी (जि. सोलापूर) धरणातील पाण्याच्या वाटपाबाबत**

**(१२) * ४५७६८ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उजनी (जि. सोलापूर) धरणाच्या पाण्याचे वाटप झाले असताना तज्ञांकडून याचा अभ्यास न करताच सदर पाणी इंदापूर तालुक्यात नेणार असल्यामुळे पुणे, सोलापूर जिल्ह्यातील पाणी संघर्ष वाढणार असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उजनी धरणाच्या कालव्यातून मंद्रूप निबर्गी रस्त्यावरील सीतामाई तलावात पाईपद्वारे पाणी सोडण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च होऊनही अद्याप कालव्यातील गेटचे काम अपूर्ण असल्याने शेतकऱ्यांना पाण्यासाठी प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, सिंचनाची कामे अपूर्ण राहिल्याने धरणातून पुर्वी केलेल्या वाटपाप्रमाणे नियोजित पाणी शेतकऱ्यांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार पाणी वाटपाप्रमाणे नियोजित पाणी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

उजनी प्रकल्पाच्या फेर जलनियोजनाच्या निर्णयाबाबत पुणे व सोलापूर जिल्ह्यातील पाणी वाटपाच्या अनुषंगाने काही प्रमाणात संघर्ष झाला होता. याबाबत पुणे व सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी समवेत चर्चा करुन समन्वयाने तोडगा काढण्यात येईल.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर कामाचा समावेश भीमा (उजनी) प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालामध्ये नसल्याने सदर काम Corporate Social Responsibility निधी मधून करण्यात आलेले आहे. शिर्ष नियामकाच्या कामाचा समावेश नसल्यामुळे शिर्षनियामकाचे काम करण्यात आलेले नाही. गेटचे काम बिगर सिंचन प्रापण सूचीमधून प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) होय.

(४) भीमा (उजनी) प्रकल्पाच्या देगाव शाखा कालव्याची २६ ते ६४ कि.मी. मधील कामे व १ ते ६४ कि.मी. मधील वितरण व्यवस्थेची कामे शिल्लक आहेत. वितरण व्यवस्थेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उमरे मेन रस्ता ते कोंडउमरे (ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) या मार्गावरील रस्त्याचे काम मंजूर करणेबाबत**

**(१३)** * **४७१५४ श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरे मेन रस्ता ते कोंडउमरे (ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या मार्गावरील ५ कि.मी अंतराच्या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्यामुळे लेखाशीर्षे ३०५४ अंतर्गत दुरुस्तीचे काम मंजूर करुन सदर रस्त्याचे तातडीने खडीकरण व डांबरीकरण करुन दुरुस्ती करण्याबाबत उमरे ग्रामपंचायतीने रितसर ठराव पारीत करुन शासनाकडे पाठविला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांना व रुग्णांना कोंडउमरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधोपचारासाठी जाण्यासाठी २० कि.मी पेक्षा जास्त अंतर वळसा घालून प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोंडउमरे व आजुबाजुच्या गावातील नागरिकांच्या होणाऱ्या गैरसोयींचा विचार करुन सदरहू रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २५ मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अशाप्रकारचा ग्रामपंचायतीचा ठराव शासनाकडे/जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) अंशत: खरे आहे. कोंडउमरे ते प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाण्यासाठी इजिमा ६८ व प्रजिमा ४७ मार्गे ९.३०० कि.मी. अंतर असून सदरचा रस्ता सुस्थितीत असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(३) अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(४) प्रश्नांकित रस्ता हा योजनाबाह्य स्वरुपाचा असून इजिमा ६८ च्या सा.क्र.४/८०० येथे सुरु होऊन प्रजिमा ४७ च्या सा.क्र.८/५०० येथे संपतो. सदर रस्त्याची एकूण लांबी ४.५०० कि.मी एवढी आहे. सदरचा रस्ता योजनाबाह्य स्वरुपाचा असल्याने रस्ते व पुल दुरुस्तीच्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन देता येत नाही. तथापि, मा. लोकप्रतिनिधींनी स्थानिक विकास कार्यक्रम, डोंगरी विकास कार्यक्रम इत्यादी योजनेंतर्गत सदर रस्त्याचे काम सुचविल्यास जिल्हा परिषदेद्वारे रस्त्याचे काम करणे शक्य आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रज्वला योजनेच्या अंमलबजावणीत झालेला गैरव्यवहार

**(१४) * ४६१०४ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महिला बचत गटाच्या सदस्यांना कायदेशीर, सामाजिक आणि आर्थिक माहिती देण्यासाठी तत्कालीन शासनाने सन २०१९ मध्ये प्रज्वला योजना सुरु केली असून महाराष्ट्र महिला आयोगामार्फत सदर योजना लागू करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या निकषानुसार संपुर्ण राज्यात ही योजना लागू करणे अभिप्रेत असतानाही केवळ निवडक जिल्ह्यात ही योजना लागू करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीकरीता प्राप्त झालेल्या निधीचा गैरव्यवहारासंदर्भात शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी समिती नेमण्याचे मा.महिला व बालविकास मंत्री यांनी आश्वासित केल्यानुसार शासनाने याप्रकरणी चौकशी समिती नियुक्ती केली आहे काय,
(५) असल्यास, सदर चौकशी समितीचे निष्कर्षासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) शासन स्तरावरुन नवीन प्रज्वला योजना राबविण्यास अथवा निधी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आलेली नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बचत गटातील महिलांना महिला आयोगाच्या स्तरावरुन प्रशिक्षण देण्यात आल्याचे दिसून येते.
(२) महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी ३० जिल्ह्यांमध्ये बचतगट कार्यशाळा तालुकास्तरावर ९८ ठिकाणी घेण्यात आल्या आहेत.
(३) डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता प्राप्त झालेल्या निधीचा गैरव्यवहार याबाबत तक्रार केली आहे. तसेच महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत राबविण्यात आलेल्या प्रज्वला योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत विधानमंडळाच्या सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना क्र.३९९ उपस्थित केली होती.
(४) होय.
(५) मा.मंत्री, महिला व बाल विकास यांनी आश्वासित केल्यानुसार दि.१४.६.२०२२ रोजीच्या ज्ञापनान्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीकडून चौकशी अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबड (जि.जालना) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(१५) * ४८१९४ श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.जालना) येथील ग्रामीण भागातील सर्व ग्रामीण रस्ते, शिव रस्ता, पाणंद रस्ते व दर्जोन्नती नसलेले रस्ते निधीअभावी नादुरुस्त व खड्डेमय झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबड तालुक्यातील चिकनगाव ते खेडगाव, लोणार भायगाव, रोहिलागड, वाकुळणी येथील मुख्य रस्त्यावर असलेली प्रचंड रहदारी पाहता शेतकरी, नागरिक व विद्यार्थ्यांना आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्यांना दर्जोन्नती देऊन निधीची तरतूद करणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंबड तालुक्यातील काही ग्रामीण रस्ते नादुरुस्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि शिव रस्ते, पाणंद रस्ते ही योजना नियोजन विभागातील रोहयो प्रभागाच्या अंतर्गत येत असल्याने सदर रस्त्यांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात रोहयो प्रभागास कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

अंबड तालुक्यातील चिकनगांव ते खेडगांव हा रस्ता ३.५० कि.मी. असून डांबरी पृष्ठभागाचा आहे. सदर रस्ता सध्या वाहतूकीयोग्य आहे.

लोणार भायगांव हे गाव राज्यमार्ग २२५ वर आहे व रोहिलागड, वाकुळणी हे गांव प्रमुख जिल्हा मार्गावर असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहेत. सदर रस्त्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

(३) रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनांतून उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार ग्रामीण रस्ते सुस्थितीत ठेवण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(४ ) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सेव्हन हिल्स रुग्णालयात महात्मा फुले जनआरोग्य योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(१६) * ४४५९७ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरोळ येथील सेव्हन हिल्स रुग्णालयात रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात सन २०१५ पासून ही योजना कार्यान्वित नसल्याने या लाभासाठी शासनाकडे सातत्याने खाजगी यंत्रणांकडून पाठपुरावा करुनही त्याला प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पात्र रुग्णांना योजनेचा लाभ तातडीने मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत:** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सेव्हन हिल्स रुग्णालयाचे दि.०२ मार्च, २०१२ रोजी अंगीकरण करण्यात आले होते. सदर रुग्णालयाविरुध्द रूग्णांकडून पैसे घेतल्याचा तक्रारी होत्या. तसेच दि.२८ डिसेंबर, २०१७ रोजी रुग्णालयाचे तज्ञ डॉक्टर्स संपावर असल्यामुळे दि.२२ फेब्रुवारी, २०१८ रोजी रुग्णालयाचे निलंबन करण्यात आले होते. परंतू रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून डायलेसिस सुरु ठेवण्यात आले होते. त्यानंतर दि.०६/११/२०१८ रोजी रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्यात आले आहे.

कोविडच्या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त रुग्णालयांचे अंगीकरण करणे आवश्यक झाल्यामुळे दि. ११/०५/२०२० रोजी झालेल्या तिसऱ्या CEDC बैठकीमध्ये सेव्हन हिल्स रूग्णालयास ए ग्रेड साठी शासकीय रुग्णालयांचे कोविडसाठी अंगीकरण करण्यात आले होते. तथापि हे रूग्णालय महापालिकेने चालवायला घेतले असल्याने आणि महापालिकेचे Bank Account रुग्णालयाने सादर न करता खाजगी बँक खात्याची प्रत सादर केली. त्यामुळे सदर रूग्णालयाचे अंगीकरण केलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील १८ वर्षावरील अनाथ मुला-मुलींसाठी शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये १ टक्का आरक्षण ठेवण्याबाबत

**(१७) * ४५२६७ श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिस्थितीमुळे आई-वडिलांनी सोडून दिलेली, अपघातात आई-वडील गमावलेली तसेच आई-वडिलांच्या मृत्यूनंतर नातेवाईकांनी अव्हरलेल्या बहुतेक मुलांना अनाथगृहाचा आश्रय घ्यावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनाथ मुला-मुलींची वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर कायद्यानुसार त्यांना अनाथगृहात राहता येत नाही तसेच या मुलांकडे कोणतेही पुराव्यादाखल आवश्यक कागदपत्रे तसेच आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे त्यांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेता येत नसून त्यांना बेघर होण्याची वेळ आल्याचे दिनांक २९ मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनाथ मुलांसाठी म्हाडा,सिडकोसह अन्य शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये १ टक्का आरक्षण ठेवण्याची मागणी अनेक संघटनांनी केली असून मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महिला व बाल विकास विभागामार्फत नाशिक येथे मुलींचे तर पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद व अमरावती येथे मुलांचे शासकीय अनुरक्षण तसेच मुंबई येथे मुलांचे स्वयंसेवी अनुरक्षण गृह अशी एकूण ७ अनुरक्षण गृहे कार्यान्वित असून या अनुरक्षण गृहांमध्ये वयाची १८ वर्ष पुर्ण झाल्यानंतर अनाथ मुलांना वयाच्या २१ वर्षापर्यंत राहण्याची व्यवस्था शासनामार्फत करण्यात येत आहे.

(३) म्हाडा सिडकोसह अन्य शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये अनाथ मुलांसाठी १ टक्का आरक्षण ठेवून सवलतीच्या दरात घरे उपलब्ध करुन देण्याबाबत तत्कालीन राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ मे, २०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरु करणेबाबत

**(१८) * ४८१२२ श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून सदरील इमारत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर यांना हस्तांतरित करून या इमारतीत सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. पालकमंत्री, लातूर यांच्याकडे माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदरील इमारत बांधकाम पूर्ण होऊन तीन वर्षाचा कालावधी झालेला असतानाही इमारत हस्तांतरणाची प्रकिया प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरील इमारत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर या संस्थेस हस्तांतरित आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) लातूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालय इमारत दिनांक २८.१०.२०२१ रोजी हस्तांतरित करण्यात आलेली आहे.

(३) व (४) लातूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालय सार्वजनिक खाजगी भागीदारी धोरणानुसार सुरु करण्याकरीता (REol) प्रसिद्ध करण्यात आलेला असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत

**(१९) * ४४७४९ श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली असली तरी वैद्यकीय सेवांच्या वाढीव दरासंदर्भात योजनेचे नुतनीकरण करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंर्गत लिंगबदल शस्त्रक्रिया, हार्मोनल थेरपीसारख्या उपचाराच्या रकमेची तरतूद कमी असून तृतीयपंथींना या योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत वैद्यकीय सुविधा घेणाऱ्या रुग्णांची खाजगी रुग्णालयांकडून मोठ्या प्रमाणात औषधे व वैद्यकीय चाचण्यांच्या नावाखाली आर्थिक फसवणूक देखील होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेत जास्तीत जास्त रुग्णालये, आजार, चाचण्या व रुग्णांसाठी लागणाऱ्या सर्वच आरोग्य सुविधांचा योजनेत समावेश करण्याच्या अनुषंगाने व योजनेची आर्थिक मर्यादा रु.५ लक्षपर्यंत वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

या योजनेंतर्गत २ जुलै २०१२ पासुन एकूण ३४५३३ तक्रारी प्राप्त झाल्या असुन त्यापैकी ३११२७ तक्रारींचे निवारण झालेले आहे आणि ३४०६ तक्रारी प्रक्रियेत आहेत.

(४) दिं.०१-०४-२०२० पासुन महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांसाठी उपचारांची संख्या ९७१ हुन ९९६ करण्यात आलेली असुन १.५ लक्षपर्यत लाभ घेता येऊ शकतो. तसचे मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी २.५ लक्षपर्यत लाभ घेता येऊ शकतो. तसेच लाभार्थी जर आयुष्मान भारत कार्ड धारक असल्यास १२०९ उपचांरासाठी एकुण रु.५ लक्षपर्यंत लाभ घेऊ शकतो. एकत्रित प्रधान मंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना नव्याने सुरु झाल्यापासून ०१.०४.२० ते ३०.०६.२२ पर्यंत एकूण १७१६२३८ शस्त्रक्रिया व उपचार झाले असून उपचारांची एकुण रक्कम रु.३१८६.४० कोटी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात पेट्रोल आणि डिझेलवरील व्हॅट दरात कपात करण्याबाबत**

**(२०) * ४४६०५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने दिनांक २१ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर कमी करण्याचा निर्णय घेतल्याने पेट्रोलचा दर रु. ९.५० आणि डिझेलचा दर ७ रुपयांनी कमी झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या या निर्णयाच्या अनुषंगाने अनेक राज्य शासनांनी पेट्रोल व डिझेल वरील (VAT) व्हॅट मध्ये कपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महागाईपासून सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने व्हॅटमधील दरात अद्यापही कपात करण्यात आली नाही, हे ही खरेआहे काय,

(४) असल्यास, व्हॅट मधील दरात कपात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) केद्र सरकारने दिनांक २१ मे, २०२२ रोजीच्या निर्णयानुसार दिनांक २२ मे, २०२२ पासून पेट्रोल आणि डिझेलवरील "रस्ते व पायाभूत सुविधा अधिभार" अनुक्रमे प्रतिलिटर रु.८.०० व रु.६.०० ने कमी केला.

(२) मूल्यवर्धित कराची आकारणी वस्तुच्या मूळ किंमत व त्यावरील केंद्रीय अबकारी कर/सेस यावर देखील होत असल्याने केंद्रीय अबकारी कर/सेस कमी झाल्यास साहजिकच वस्तुवरील एकूण मूल्यवर्धित कर देखील कमी होतो. सबब, केंद्र सरकारच्या दि. २१ मे, २०२२ च्या निर्णयानुसार पेट्रोल व डिझेलवरील प्रतिलिटर मिळणाऱ्या मूल्यवर्धित कराच्या रकमेत घट होणे अभिप्रेत होते. परंतू मे २०२२ नंतर पेट्रोल व डिझेलच्या मूल्यवर्धित कर कायद्याच्या अनुसूचीतील दरात इतर कोणत्या राज्याने कपात केल्याची माहिती उपलब्ध नाही.

(३) राज्य शासनाने दिनांक १५ जुलै, २०२२ पासून पेट्रोलच्या करात रु.५/- प्रतिलिटर आणि डिझेलच्या करात रु.३/- प्रतिलिटर इतकी कपात केली आहे. यामुळे राज्यातील जनतेला महागाईपासून निश्चितपणे दिलासा मिळेल.

(४) वरील (३) प्रमाणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर मधील शासकीय तथा खाजगी रक्तपेढीमधून पूरवठा करण्यात आलेल्या रक्तामुळे बालकांना एचआयव्हीची लागण झाल्याबाबत

**(२१) * ४६८२७ श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे शासकीय तथा खाजगी रक्तपेढीमध्ये २२५ रक्तबॅगेत हेपॅटायटीस-बी व १३३ रक्तबॅगेत हेपॅटायटीस-सी चे विषाणू आढळून आल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूरमध्ये थॅलेसेमिया व सिकलसेल या आजाराने ग्रस्त असलेल्या ४ मुलांना रक्त पुरवठा करण्यात आलेल्या मुलांना एचआयव्हीची लागण होऊन १ मुलाचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार याप्रकरणात दोषी असलेल्या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

जानेवारी, २०२२ ते मे, २०२२ दरम्यान शासकीय व अशासकीय रक्तकेंद्रात संकलित केलेल्या रक्तपिशव्यांची चाचणी केली असता, २३३ रक्तपिशव्यांमध्ये हेपेटाईटिस-बी व ६१ रक्तपिशव्यांमध्ये हेपेटाईटिस-सी चे विषाणू आढळून आले. दुषित रक्त नियमाप्रमाणे नष्ट (discard) करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

या अनुषंगाने वैद्यकीय अधिक्षिका, डागा स्मृती रुग्णालय, नागपूर यांनी अन्न व औषध प्रशासनाचे प्रतिनिधी, केंद्रीय औषध नियंत्रक यांचे प्रतिनिधी व रक्त संक्रमण क्षेत्रातील तज्ञ यांची समिती गठीत केली होती. सदर समितीने सविस्तर चौकशी केली असता एकूण ०५ थॅलेसिमिया रुग्णांना एच.आय.व्ही. / एच.सी.व्ही. ची लागण झाल्याचे निदर्शनास आहे. तथापि समितीने ज्या खाजगी रक्तकेंद्रातून या बाधीत रुग्णांना रक्त पुरवठा करण्यात आला होता त्या रक्तकेंद्रांना भेट देऊन सदर रुग्ण हे बाधित नसतानाचा कालावधी पासून बाधित झाल्याच्या कालावधी पर्यंतचे सर्व दस्तऐवज तपासले असता यापैकी कोणत्याही रुग्णाला एच.आय.व्ही. / एच.सी.व्ही. संक्रमित रक्तपिशवी देण्यात आलेली नाही. सबब रक्तातून एच.आय.व्ही. / एच.सी.व्ही. बाधा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) होय.

अन्न व औषध प्रशासनाचे प्रतिनिधी, केंद्रीय औषध नियंत्रक यांचे प्रतिनिधी व रक्त संक्रमण क्षेत्रातील तज्ञ यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी तज्ञ समितीने ज्या रक्तपिशव्यातील रक्त थॅलेसिमिया रुग्णांना संक्रमित केले होते त्या सर्व रक्तपिशव्यांचे चाचणी अहवाल तपासले असता ते निगेटिव्ह आढळले. त्यामुळे रक्तकेंद्र किंवा कर्मचारी यांना दोषी ठरविता येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने अवैध मद्य विक्री संदर्भात केलेल्या कारवाईबाबत

**(२२) * ४७३८४ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात अवैध मद्य विक्री होत असून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने छापे टाकून सुमारे ३४६ प्रकरणी कारवाई करुन लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०२१-२२ या वर्षात अवैध मद्य निर्मिती, विक्री व वाहतूक विरोधात एकूण ३४६ गुन्हे नोंद करण्यात येऊन एकूण २५६ आरोपींना अटक करुन २२ वाहने जप्त केली आहेत. त्यामध्ये एकूण रु.२२,४६,१५८/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * ४४५४७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत विविध संवर्गाच्या १३,५२१ पद भरतीची जाहिरात प्रसिध्द होऊनही ग्रामविकास व सामान्य प्रशासन विभागाच्या समन्वयाअभावी भरती प्रक्रिया चार वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर भरतीच्या अनुषंगाने राज्यभरातील सुमारे १३ लाख सुशिक्षीत बेरोजगार, गोरगरीब युवकांकडून परीक्षा शुल्क म्हणून घेण्यात आलेली २५ कोटी ८७ लाख रुपयांची रक्कम शासनाकडे जमा असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर पदभरती सत्वर पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) ग्रामविकास विभागाच्या दि.१० मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित पाच संवर्गातील पदभरती जि. प. स्तरावर जिल्हा निवड मंडळातर्फे करण्याबाबत व त्याअनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## कवठा-हिवरदरी (ता.महागाव ,जि.यवतमाळ) या रस्त्याच्या बांधकामापूर्वीच देयके पारीत केल्याबाबत

**(२४) * ४७५२८ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवठा-हिवरदरी (ता.महागाव ,जि.यवतमाळ) या दोन किमी लांबीच्या डांबरी रस्त्याचे बांधकाम न करता बनावट मोजमाप पुस्तिकेद्वारे (एमबी रेकॉर्ड) सुमारे ३० लक्ष रुपयांची देयके पारीत केल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
कवठा-हिवळदरी जोडरस्ता (ग्रामा-८९) सा.क्र. ०/०० ते १/०० या रस्त्याचे काम झालेले नसताना संपुर्ण काम पूर्ण झाल्याची नोंद मोजमाप पुस्तिकेत घेण्यात आल्याची बाब निदर्शनास आली असल्याचे, तथापि सदर कामाचे देयक अदा करण्यात आलेले नसल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी कु. अपर्णा डोनेकर, कनिष्ठ अभियंता यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आल्याचे, तसेच श्री. एम. एम. कुमठे, उप अभियंता यांच्या निलंबनाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांना सादर केला असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.
सद्य:स्थितीत सदरचे काम कंत्राटदाराकडून पूर्ण करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून काम गुणवत्तापुर्वक पूर्ण केल्यानंतरच देयक अदा करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ. सुतारवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

**(२५)** * **४४७७८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुतारवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे प्रकल्पाचे सर्व्हेक्षण झाले असून हा प्रकल्प अस्तित्वात आल्यास मौजे ढाकमोली, आंबीटगाव, तुरंबव, वाडदेवाडी, वहाळ, निवळी, पालवण, खांडोत्री या गावांतील पाण्याचे तुटवडा कायमस्वरूपी दूर होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने प्रशासकीय मान्यतेसह पुढील कार्यवाही त्वरीत पूर्ण होवून काम सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) सदर योजनेचे सर्वेक्षण पूर्ण करून प्रकल्पाचे अंदाजपत्रक माहे एप्रिल-२००७ मध्ये उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कळवा-ठाणे या मंडळ कार्यालयामार्फत महामंडळ कार्यालयास सादर करण्यात आले होते.
तथापि, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने त्यांचे इंग्रजी पत्र क्र. MWRRA /२०१० /PRCL /KIDC / ५४ /६९६ दि. ०५/०८/२०१० अन्वये मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानुसार रत्नागिरी जिल्ह्यात सिंचनाचा अनुशेष असला तरी जिल्ह्यात त्यावेळी प्रगतीपथावर असलेल्या योजनामधून सिंचनाचा अनुशेष भरुन येणार असल्याने रत्नागिरी जिल्ह्यात नविन सिंचन प्रकल्पाची आवश्यकता नाही असे कळविले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही करणेत आलेली नाही. सध्य:स्थितीतही रत्नागिरी जिल्ह्यात अनुशेष नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**गेवराई (जि.बीड) येथील नऊ रस्त्यांच्या कामांचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन मध्ये समावेश करण्याबाबत**

**(२६) *४५५८४ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेल्या नऊ रस्त्यांची कामे सन २०२० मध्ये शासनाने रद्द केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने सदर रद्द करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांना मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा दोन मध्ये प्राधान्याने समावेश करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या असताना ते न करता प्रशासकीय पातळीवर पुन्हा कोरनेटवर्क, समिती शिफारस असे अडथळे प्रशासकीय यंत्रणांकडून निर्माण केले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रद्द करण्यात कामांचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन मध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मुख्यमंत्री ग्राम सडक योजना (संशोधन व विकास) अंतर्गत बीड जिल्ह्यातील रद्द झालेल्या २३ पॅकेजमधील रस्त्यांच्या कामांचा प्राधान्याने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ मध्ये योजनेच्या निकषानुसार, समावेश करण्याबाबतच्या आशयाचे शपथपत्र मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेले आहे. तद्नंतर मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ च्या अंमलबजावणीस दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता मिळालेली असून सदर योजनेच्या निकषानुसारच बीड जिल्ह्यातील रद्द झालेल्या कामांचा सदर योजनेत समावेश करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात "मिशन वात्सल्य" योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत**

**(२७) * ४४५८० श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ. विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गाने मातृ-पितृ छत्र हरपलेल्या अनाथ बालकांना तसेच कुटुंबातील कर्त्या पुरुषांचे कोरोनाने निधन होऊन एकल किंवा विधवा झालेल्या महिलांच्या उपजिविकेसाठी तसेच अर्थसहाय्य मिळवून देण्याचा प्रयत्न 'मिशन वात्सल्य' या योजनेअंतर्गत करण्यात यावा असे शासनाचे निर्देश आहेत तथापि, या योजनेच्या तालुका पातळीवर नियमित बैठका होत नसल्याचे दिनांक ६ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्याच्या तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली आठवड्याला एक या प्रमाणे महिन्याला चार बैठका घेणे अपेक्षित असतानाही मुंबई उपनगरातील अंधेरी, कुर्ला व बोरिवली या तीन तालुक्यात फक्त दोन बैठका आणि सहा महिन्यात पाच बैठकाही न झालेले अनेक तालुके असल्याचा आरोप एकल महिला पुनर्वसन समितीने केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकण प्रदेशातील मुंबई, मुंबई उपनगर जिल्ह्यांसह अन्य ५ जिल्ह्यातील १५० अनाथ बालकांची पी.एम.चाईल्ड केअर योजनेत नोंदणी झालेली असताना आतापर्यंत त्यापैकी केवळ ८३ बालकांच्याच खात्यात मुदत ठेव निधी जमा केला असून उर्वरित ठाणे (सर्वाधिक अनाथ बालके), व मुंबईसह ६७ लाभार्थी बालके या योजनेच्या मुदत ठेव निधीसह अन्य आर्थिक लाभापासून वंचित राहिले असल्याचे दि. १० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेच्या प्रत्येक तालुक्यात नियमित बैठका घेऊन तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन त्यांचा लाभ अनाथ बालकांना तसेच विधवा महिलांना देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) माहे एप्रिल, २०२२ अखेर मिशन वात्सल्य अंतर्गत तालुका निहाय समित्यांच्या बैठका मुंबई उपनगर जिल्हयामध्ये अनुक्रमे अंधेरी-४, कुर्ला-५ बोरीवली-५ अशा बैठका झाल्या आहेत. तर मुंबई शहर जिल्हयामध्ये ६, रायगड जिल्हयामध्ये ४९, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये - २००, रत्नागिरी जिल्हयामध्ये -५५, ठाणे जिल्हयामध्ये -७ व पालघर जिल्हयामध्ये -३० इतक्या बैठका झाल्या आहेत.
(३) हे खरे नाही,
कोकण विभागातील सर्व पात्र लाभार्थ्यांना पी.एम. केअर फॉर चिल्ड्रेन योजनेचा लाभ देण्यात आला आहे.
(४) मिशन वात्सल्य योजनेंतर्गत दिनांक १३ जुलै, २०२२ अखेर एकूण १,२०,६४० लाभार्थ्यांना शासन निर्णयामध्ये नमूद २४ सेवांचे २५,९२४ एवढे लाभ देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील फार्मा सिटीकल प्रोडक्ट्स इंडिया लि. या कंपनीने आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२८) * ४४९०४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील फार्मा सिटीकल प्रॉडक्ट्स इंडिया लि. कंपनीने माझगाव ग्रुप ग्रामपंचायतीचा सुमारे २ कोटी रुपयांपेक्षा अधिक कर न भरता कंपनीची परस्पर विक्री करुन आर्थिक फसवणूक केल्याचे माहे जून,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीची पंचायत समितीच्या कराची थकबाकी असतानाही महसूल विभागाची दिशाभूल करुन खरेदी केल्याचे निदर्शनास येवूनही पंचायत समितीमार्फत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित कंपनी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदरहू प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी,पंचायत समिती खालापूर यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून, ग्रामपंचायत माझगाव यांची पंचायत समिती स्तरावरुन पडताळणी केली असता संबंधित कंपनीला कोणतेही कर मागणी देयक ग्रामपंचायतीतर्फे बजाविण्यात आलेले नाही. याबाबत पंचायत समिती स्तरावरुन ग्रामपंचायत माझगाव यांना दि.०८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी योग्य ती पडताळणी करुन संबंधितांवर नियमानुसार कारवाई करणेबाबत कळविण्यात आले. त्यानुसार दि.११/०७/२०२२ रोजी सरपंच/ग्रामसेवक , ग्रामपंचायत माझगाव यांनी ग्रामपंचायतीचे खोटे दस्तऐवज तयार केल्याप्रकरणी खालापूर पोलीस ठाणे येथे रितसर तक्रार दाखल केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तापी नदीवरील सारंगखेडा, सुलवाडे आणि प्रकाशा या तिन्ही बॅरेजची दुरुस्ती करणेबाबत**

**(२९) * ४४७३८ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१). तापी नदीवरील सारंगखेडा, सुलवाडे आणि प्रकाशा या तिन्ही बॅरेजच्या दुरूस्तीसाठी शासनाने निधी दिला नसल्याने या तिन्ही बॅरेजच्या लोखंडी दरवाजावर गंज चढल्याने नदी काठावरील २०० गावांना धोका निर्माण झाल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२).असल्यास, उक्त बॅरेजच्या कामांची दुरूस्ती करण्यासाठी वेळोवेळी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात येऊनही तापी खोरे विकास महामंडळ याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू दुरुस्तीचे काम त्वरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४). नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

तथापि सारंगखेडा बॅरेज प्रकल्पाच्या लोखंडी दरवाज्यांवर अधो बाजूस असणारा प्रकाशाबॅरेज पूर्ण क्षमतेने भरल्यावर उभ्या उचलद्वारांचा १.२५ मी.भाग (अधोबाजूस) पाण्याखाली राहतो,यामुळे द्वारांचा खालील भाग Panel P-१ गंजून खराब झाला आहे.मा त्र यामुळे नदी काठावरील २०० गावांना धोका निर्माण झाला आहे हे खरे नाही.

(२) नाही.

(३) सारंगखेडा बॅरेजवरील द्वार निरीक्षण अहवालाच्या अनुषंगाने वर्गवारी-१ त्रुटीबाबत दुरुस्तीसाठी करावयाच्या उपाय योजनांबाबत स्थापन समिती अहवालानुसार सदर थोपद्वारे IS १४१७७-१९९४ नुसार उच्च प्रतीचे गंजरोधक रंगकाम यांत्रिकी यंत्रणेमार्फत करणेबाबत सुचविले आहे. तसेच Pylon. Hoist Bridge, Hoisting Arrangement, Stair Case etc. भागांची स्वच्छता करुन गंजरोधक रंगकाम तातडीने करणेबाबत कळविले आहे. तसेच पावसाळा पश्चात निरिक्षणांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार तिन्ही बॅरेजचे देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**व्यावसायिक नाटकांप्रमाणे बालनाटकांनाही अनुदान देण्याबाबत**

**(३०) * ४४७०३ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राणाजगजीतसिंह**

**पाटील (तुळजापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तीन वर्षापूवी बालरंगभूमी स्थापन करण्यात आली असून व्यावसायिक नाटकांप्रमाणे बालनाटयांनाही शासनाने अनुदान देण्याची मागणी गत दोन वर्षापासून शासनाकडे करण्यात येऊनही अद्याप त्यावर कोणताच निर्णय झालेला नसल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हे अनुदान सरसकट सर्व बालनाटयांना न देता केवळ दोन अंकी बालनाटयांनाच दयावे व नाटकाचा दर्जा ठरविण्यासाठी जाणकारांची समिती नेमावी व या समितीनेच अनुदानाबाबत निर्णय घ्यावा अशीही मागणी बालरंगभूमी परिषदेने शासनाकडे केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यावसायिक नाटकांप्रमाणे बालनाटकानांही शासन अनुदान मिळण्याबाबत केलेल्या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

व्यावसायिक नाटकांप्रमाणे बालनाटयांनाही शासनाने अनुदान देण्याची मागणी शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) बालरंगभूमी परिषदेने केलेली मागणी शासनास अप्राप्त असल्याने याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### ." संत जनाबाई सामाजिक सुरक्षा आणि कल्याण " योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३१) * ४५२७१ श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरकाम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षा आणि कल्याणासाठी शासनाने सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये " संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना " या योजनेची घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेकरीता अर्थसंकल्पात रुपये २५० कोटी रक्कमेची तरतूद करण्यात येऊनही सदर योजनेची अद्याप अंमलबजावणी झाली नसल्याने हजारो महिला आर्थिक लाभापासून वंचित असल्याचे दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरेलू कामगार मंडळाने शिल्लक राहिलेला निधी शासनाकडे जमा केला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना काळात आर्थिक मदतीपासून वंचित राहिलेल्या घरेलु कामगार महिलांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), व (४) संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजनेबाबत मंत्रीमंडळ प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे सक्रिय व जिवीत नोंदणी असलेल्या ६०,९२३ इतक्या पात्र घरेलू कामगारांना प्रत्येकी रु. १५००/- इतके अर्थसहाय्य डी.बी.टी. द्वारे त्यांच्या खात्यात वाटप करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मंजुर ट्रामा केअर सेंटरच्या उभारणीबाबत

**(३२) * ४४६१२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामार्गावर होणारे अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता अपघातग्रस्तांसाठी गोल्डन अवरमध्ये वैद्यकीय मदत उपलब्ध होणेसाठी सन २०१३ मध्ये १०८ ट्रामा केअर सेंटर उभारणीचा बृहत आराखडा शासनाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत या १०८ ट्रामा केअर सेंटरपैकी केवळ ६३ सेंटर कार्यरत असून उर्वरीत ४५ सेंटरपैकी १५ सेंटरचे बांधकाम अपूर्ण तर ३० सेंटरचे आराखडेच तयार करण्यात आले नसल्याने सदर ४५ सेंटर ही मागील ९ वर्षापासून कार्यान्वित झाली नसल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील काही सेंटरसाठी जागा उपलब्ध नसून काही सेंटर बंद असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, प्रत्येक ट्रामा केअर सेंटरमध्ये दोन अस्थीव्यंगोपचार तज्ज्ञ, दोन बधिरीकरण तज्ज्ञ यासह ३३ पदांना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने सन १९९७ ते आजपर्यंत १०८ ट्रामा केअर सेंटर मंजूर केले आहे. सन २०१३ च्या बृहत आराखड्यानुसार ४२ नविन ट्रामा केअर सेंटर्सना मंजूरी देण्यात आली आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३) (४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ट्रामा केअर सेंटरबाबत शासनास शिफारस करण्यासाठी गठीत तांत्रिक समितीचा अहवाल/शिफारशी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०२० स्विकारण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने ट्रामा केअर युनिटचे वर्गीकरण केले असुन ट्रामा केअर ची दर्जावाढ करण्यास मदत होणार आहे. त्याअनुषंगाने आयुक्तालयाने दिनांक २९.१२.२०२१ रोजी सदर शिफारशी विचारात घेऊन अस्तित्वात असलेल्या ट्रामा केअर यूनिट संबधित सुधारीत आकृतीबंध शासनास सादर केला आहे. याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. परंतू सदर प्रस्तावात काही त्रुटी असल्याने त्याबाबत आयुक्तालयाकडून माहिती मागविण्यात आली आहे.

-----------------

## बीड, जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागात झालेला गैरव्यवहार

**(३३) * ४४६४९ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागाने सन २००४ मध्ये अनुकंपातत्वावर भरती झालेल्या शिपायांना आरोग्य

सेवकांचे वेतन देण्याचा निर्णय घेतला असून त्यातील १८ लोकांना द्यावयाच्या रकमेच्या प्रदानामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कागदपत्रांची कोणतीही पडताळणी न करता सदरहू प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

अनुकंपा तत्वांतर्गत गट-क ची शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या १८ उमेदवारांना पद उपलब्धते अभावी तात्पुरत्या स्वरुपात गट-ड पदावर नियुक्त्या दिल्या होत्या. जसजसी गट-क ची पदे रिक्त होतील तसे सेवाज्येष्ठतेनुसार सदर कर्मचाऱ्यांचे गट-क पदावर समायोजन केले आहे. सदर कर्मचाऱ्यांना गट-क पदी समायोजन झाल्याच्या दिनांकापासून वेतन निश्चिती करुन फरक देण्याऐवजी गट-ड च्या पदी नियुक्ती झाली त्या दिनांकापासून देणेबाबत चुकीने आदेशात नमूद झाले होते. सदर बाब निदर्शनास येताच सदर आदेश रद्द केले आहेत. यामध्ये गैरव्यवहार झालेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविकांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत**

**(३४) * ४४६५८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांचे वेतन माहे फेब्रुवारी, २०२२ पासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या अंगणवाडी सेविकांचे बॅंक ऑफ महाराष्ट्र मध्ये खाते आहे त्यांचे मानधन जमा होऊन पुन्हा वजा झाला असल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंगणवाडी सेविकांचे थकीत वेतन, वाढीव मानधन तसेच भविष्यात नियमितपणे वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही,
राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे माहे जुलै २०२२ पर्यंतचे मानधन केंद्र शासनाच्या PFMS प्रणाली व्दारे अदा करण्यात आले आहे.

(२) हे अंशत:खरे आहे,
बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये खाते असणा-या काही अंगणवाडी सेविका / मदतनीस यांच्या आधार क्रमांक व बँक खाते यामधील तांत्रिक अडचणींमुळे त्यांना चुकीची मानधन रक्कम म्हणजेच कमी अथवा जास्तीची रक्कम वर्ग झाली होती.

याबाबत बँक ऑफ महाराष्ट्राचे पुणे येथील डाटाबेस सेंटरमधून माहे एप्रिल, २०२२ मध्ये चुकीची मानधन रक्कम वर्ग झालेल्या सेविका / मदतनीस यांच्या बँक खात्यांवर होल्ड लावण्यात आला होता. तद्नंतर माहे नोंव्हेंबर २०२१ ते फेब्रुवारी २०२२ या कालावधीतील संबंधित सेविका/मदतनीस यांना वर्ग झालेले मानधन रक्कम बँककडून डेबिट करुन घेण्यात आले व पुन्हा त्यांची देय मानधन रक्कम पुन्हा त्यांचे खात्यांवर क्रेडिट देण्यात आले. सदर प्रक्रिया चालू असेपर्यंत संबंधित सेविका/मदतनीस यांच्या बँक खात्यांवर होल्ड लावण्यात आले होते. यासर्व प्रक्रियेमध्ये सेविका/मदतनीस यांना कोणताही आर्थिक व्यवहार न करता आल्याने त्यांची गैरसोय झाल्याचे निदर्शनास येते. याबाबत बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये असणा-या अंगणवाडी कर्मचा-यांच्या खात्यावरील होल्ड काढण्याबाबत बॅकेस सुचित करण्यात आले आहे.
(३) व (४) सद्यस्थितीत माहे जुलै २०२२ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे.

-----------------

**कोरोना काळात कार्यरत असलेल्या आशा सेविकांचे प्रलंबित मानधन अदा करण्याबाबत**

**(३५) * ४४६१४ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), अॅड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :**
सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गाच्या काळात जोखमीचे काम करण्यासाठी आशा सेविकांना सन २०२१ पासून मार्च, २०२२ पर्यंत ३००० रुपये प्रती महिना वाढीव मानधन त्याचप्रमाणे ५०० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याचे जाहिर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड काळात निधी व वेळेअभावी काही जिल्ह्यांमध्ये आशासेविका व गटप्रवर्तक यांना प्रशिक्षण न देताच थेट कामावर रुजू होण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिले होते तथापि त्यांना मोबदला अदा करतेवेळी किमान प्रशिक्षण अनिवार्य केल्यामुळे त्यांना कोणत्याच प्रकारचे मानधन देता येणार नसल्याचे परिपत्रक आरोग्य विभागाने जारी केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागाने निर्गमित केलेले सदर परिपत्रक रद्द करुन कोरोना काळात काम केलेल्या आशासेविका व गटप्रवर्तक यांचे प्रलंबित मानधन अदा करुन त्यांना शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारे शासकीय सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालयांमध्ये औषधांचा पूरवठा करण्याबाबत**

**(३६) * ४४७६४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संतोष दानवे**

**(भोकरदन), डॉ. विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालयांमध्ये दैनंदिन वापराची औषधे, इंजेक्शने, प्रतिजैविके तसेच विविध वैद्यकीय साहित्यांचा तुटवडा निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रुग्णालयांना आवश्यक साठा पुरविण्यात हाफकीन बायो-फार्मा कॉर्पोरेशन या संस्थेला अपयश आल्याने या संस्थेच्यावतीने केंद्रीय पद्धतीने आवश्यक औषधांची खरेदी करण्यात येवूनही शासकीय रुग्णालयांना पुरेशा प्रमाणात औषध साठा उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे काय,

(३) तसेच, शासनाकडून देयके थकीत असल्याने औषध पुरवठादारांनी औषध पुरवठा थांबविल्यामुळे रुग्णांवर आर्थिक भार तसेच त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयात औषध तुटवडयासंदर्भात चौकशीसाठी दोन सदस्यांची समिती माहे मार्च-एप्रिल, २०२२ मध्ये नियुक्त केली असून सदर
समितीने अहवाल सादर केला आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार औषधे व वैद्यकिय साहित्यांचा पुरवठा तसेच संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २६.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना आवश्यक असणारी औषधे व अन्य तद्नुषंगिक बाबींची खरेदी हाफकिन महामंडळामार्फत करण्यात येते. संस्थास्तरावर वित्तीय मर्यादेच्या अधिन राहून स्थानिक स्तरावर दर पत्रकाच्या आधारे तसेच आवश्यकतेनुसार रुग्णसेवा अबाधित ठेवण्यासाठी जीवरक्षक औषधांची खरेदी स्वीय प्रपंजी खाते, महात्मा फुले जन आरोग्य योजना इ. योजनांमधून प्राप्त होणा-या निधीतून खरेदी करण्यात येऊन रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येते.

(३) नाही.

(४) होय.

(५) नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.